# शोषितांच्या साहित्यांतर्गत स्त्रीवादी साहित्य एक आकलन

जागतिक परिप्रेक्ष्यातून शोषितांच्या साहित्याचा विचार करता येतो. जगभरातील वेगवेगळ्या शोषितांनी आधुनिक काळात आपल्या अनुभवांना साहित्याच्या माध्यमातून व्यक्त केले. त्यांचे साहित्य हे त्यांच्या शोषणाला अधोरेखित करणारे आहे. आपल्या जगण्याची व्यथा, वेदना, दुःख मांडताना वास्तवाचा प्रखरतेने नोंद घेणे हेच या साहित्याचे वैशिष्ट्य ठरते. शोषितांच्या साहित्यांतर्गत स्त्रीवादी साहित्याचा विचार करता येतो. स्त्रीशोषणाचे स्वरूप आणि त्याचे संदर्भ यामुळे तपासता येतील. सत्रीशोषणाला अधोरेखित करताना स्त्रीवादी साहित्य कोणता नवा आशय साहित्यातून मांडू पाहते, त्यामुळे एकूण साहित्यात या प्रवाहामुळे कोणती भर पडली याचा विचार करता येतो. आधुनिक काळात जगभर झालेली प्रबोधनाची चळवळ आणि त्यातून अधोरेखित झालेल्या विचाराने संपूर्ण मानवी जगण्याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. याच काळात स्त्रीप्रश्नांकडे गांभिर्याने पाहिले गेले. समाजातील सर्वच स्तरातील शोषितांना आत्मभान आणून देणारा, त्यांच्यातील आत्मसन्मान जागृत करणारा हा काळ आहे. तोपर्यंत आपण शोषण करणाऱ्या व्यवस्थेचे गुलाम आहोत, स्वतःला समाजात ओळख असायला हवी, माणसासारखे समाजाने वागवले पाहिजे या गोष्टींपासून शोषित वर्ग अनभिज्ञ होता. स्वतःकडे नव्याने पाहणे, आपण ज्या शोषित वर्गाचे प्रतिनिधित्व करतो त्या वर्गाकडे नव्या नजरेने पाहणे आणि यासाऱ्याला साहित्याच्या माध्यमातून व्यक्त केले गेले. त्यामुळे त्यांच्या जगण्याशी, वेदनेशी, वास्तवाशी प्रामाणिक राहून त्यांचे साहित्य येते. प्रत्येक व्यवस्थेत सत्तास्थानी असलेली व्यवस्था आपली सत्ता, आपले स्थान टिकविण्यासाठी धडपडत असते. त्यातून शोषणाची मालिका सुरू होते आणि मग सत्तासंघर्षही सुरू होतो. सत्ताकेंद्री असलेले आपली सत्ता कायमस्वरूपी टिकविण्यासाठी, ती अधिक बळकट करण्यासाठी वर्षानुवर्षे प्रयत्न करत असतात. त्यांना हव्या तशाच समाजव्यवस्थेच्या चौकटी तयार होऊ लागतात. जेणे करून शोषितांवर सहजपणे हक्क बजावणे शक्य होते. कधी ही शोषणाची परंपरा वर्णद्विषातून, तर कधी वर्गानुसार आणि लिंगभेदामुळे अस्तित्वात आलेली दिसते. वर्णभेदातून निर्माण झालेला वर्णद्विष त्यातून होणारे शोषण, जातीच्या उतरंडीत पिचला गेलेला वर्ग त्यातून या वर्गाचे होणारे शोषण आणि लिंगभेदामुळे शोषण सहन करावा लागणारा स्त्रीवर्ग. जगभर ही परंपरा कमी अधिक प्रमाणात दिसते. या साऱ्याच शोषणाच्या विरोधात जगभर चळवळी झाल्या. कधी चळवळीच्या अनुशंगाने तर कधी आत्मभानाच्या अनुशंगाने साहित्य लिहिले गेले. शोषितांच्या साहित्यांतर्गत स्त्रीसाहित्याचा विचार येथे महत्त्वाचा ठरतो.

जगभरातील जवळजवळ सगळ्याच व्यवस्था या पुरुषकेंद्री आहेत. ज्या समाजाची व्यवस्था पुरुषकेंद्री आहे किंवा त्या समाजाच्या सत्तास्थानावर पुरुष आहे अशा सगळ्याच व्यवस्थांमध्ये स्त्री ही दुय्यम स्थानावर आहे. स्त्री - पुरुष नात्यातील असमानता अशा व्यवस्थांमध्ये स्पष्टपणे जाणवते.

स्त्रीवर्गावर केवळ वर्चस्वच गाजवत नाही तर कायमस्वरूपी नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी समाजातील सगळ्याच व्यवस्था स्वतःच्या सोईने वापर करून घेते. त्यामुळे आपोआपच पुरुषप्रधान व्यवस्था आपल्या सत्तास्थानाच्या जोरावर स्त्रीला विशिष्ट्य चौकटीत बंदिस्त करून स्वतःच्या दृष्टीने व्यवस्थेची अंमलबजावणी कशी करता येईल याचा विचार पुरुषप्रधान व्यवस्था करते. समाजात स्त्रीला असणारे दुय्यम व नगण्य स्थान स्त्रीवर होणाऱ्या शोषणाचे प्रतीक ठरते. या पार्श्वभूमीवर २० व्या शतकात उदयास आलेली स्त्रीवादी विचारप्रणाली महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते. स्त्रीला तिच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारी ही महत्त्वाची विचारप्रणाली आहे. 'स्व' कडे पाहण्याची नवी दृष्टी स्त्रीला मिळाली. मेरी वुलस्टोन क्राफ्ट, जॉन स्टुअर्ट मिल, केट मिलेट, व्हर्जिनिया वुल्फ, सिमॉन द बोव्हा इ. लेखिकांच्या विचारातून स्त्रीवादी विचारला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त झाले. विकसित देशाबरोबर जगभरातील अविकसित देशातही या विचारप्रणालीचा प्रभाव दिसतो.

स्त्रीला तिच्या शोषणाची जाणीव करून देणे, तिला तिच्या अस्तित्वाची जाणीव करून देणे, अन्यायाला विरोध करण्याचे सामर्थ्य निर्माण करणे, वेगवेगळ्या पातळीवर होणाऱ्या शोषणाचे संदर्भ तपासणे, स्त्री साहित्यातील अनुभवविश्वाचा वेध घेणे, साहित्यातून येणारी स्त्रीप्रतिमा आणि पुरुषप्रतिमा याची चिकित्सा, स्त्रीच्या लेखनपरंपरेचा शोध, पुरुषसाहित्यातून येणाऱ्या स्त्रीप्रतिमेतील विरोधाभास स्पष्ट करणे आणि पुरुषप्रधान व्यवस्थेची स्त्रीविषयक दुटप्पी भूमिका स्पष्ट करणे अशा वेगवेगळ्या अंगाने स्त्रीवादी विचार स्त्रीविश्वाचा वेध घेताना दिसते. स्त्रीवादी विचारामुळे समाजातील स्त्रीचा दर्जा तपासणे जसे शक्य झाले तसेच एकूणच समाजाचा नव्या संदर्भातून पुनर्विचार करणेही शक्य झाले. स्त्रीसंदर्भातील शोषण व्यवस्था आणि तिचा खरा चेहरा समोर आला. यातूनच पुरुषप्रधान व्यवस्थेला विरोध व व्यवस्थेच्या पुर्नबांधणीचा विचार सुरू झाला. स्त्रीवादी विचारामुळे झालेली जाणीव - जागृती महत्त्वाची ठरते. जागतिक स्तरावर घडणाऱ्या स्त्रीविषयक घडामोडींच्या प्रभावापासून जगभरातील स्त्रीवर्ग फार काळ अलिप्त राहू शकला नाही. त्याचा परिणाम निश्चितच स्त्रियांच्या जगण्यावर झाला. स्त्रीशोषणाच्या कारणांचा शोध घेताना लिंगभेदाचे केले जाणारे राजकारण आणि स्त्रीकडे पाहण्याची मानसिकता या संदर्भाचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. स्त्रीकडे पाहण्याची समाजाची मानसिकता न्यूनतेच्या पातळीवरची आहे. ती नाजूक, शोषित, सहनशील आणि मुख्यतः उपभोगाची वस्तू ही प्रतिमा स्त्रीची समाजात स्थिर झालेली दिसते. या व्यवस्थेच्या प्रभावाखाली जगत असल्याने स्त्रियांचेही स्वतःकडे पाहणे अभावात्मकच दिसते. आजही स्त्रियांची ही मानसिकता पूर्णपणे बदलली आहे असे नाही. स्वतःकडे अभावाच्या दृष्टीने पाहण्याचा विचार बाजूला करत स्त्रीतील सामर्थ्याची ओळख स्त्रीवादी विचाराने करून दिली. स्त्रीच्या मानसिक स्थित्यंतराचा महत्त्वाचा टप्पा हा विचार ठरतो. त्यादृष्टीने याविचारप्रणालीचा विचार महत्त्वाचा ठरतो.

जगभरातील स्त्रीचे शोषण हा समान धागा असला तरी प्रत्येक ठिकाणच्या शोषणाचे संदर्भ भिन्न राहतात. त्यावरून त्या - त्या समाजाने स्त्रीला दिलेला दर्जा तपासता येतो. भारतीय स्त्रीवादाचा विचार

करताना भारतीय स्त्रीच्या शोषणाचे संदर्भ तपासणे गरजेचे ठरते. भारतीय स्त्री एका विशिष्ट अशा चौकटीत वर्षानुवर्षे बंदिस्त असलेली दिसते. धर्म, जात, या व्यवस्थांचा आधार घेत भारतीय स्त्रीजीवन बंदिस्त केले गेले. भारतीय स्त्रीच्या शोषणास पुढील बाबी कारणीभूत ठरल्या.

१. समाजव्यवस्थेच्या महत्त्वाच्या स्थानावर पुरुषांचे वर्चस्व आणि स्त्रीला या सगळ्याच व्यवस्थांमध्ये दुय्यमस्थान.
२. स्त्री - पुरुषातील जैविक भेदाला मोठे करून कुटुंब आणि समाज याठिकाणी असमान वाटणी
३. विशिष्टतऱ्हेने दोघांच्या मानसिकता पारंपरिक पद्धतीने घडविण्याचा प्रयत्न.
४. स्त्रीला उपभोग्य वस्तू ठरवून तिचे केलेले वस्तुकरण
५. स्त्रीची जाणिवपूर्वक बनविली गेलेली प्रतिमा
६. धर्म, जात यांच्या वाहक बनवून मानसिक खच्चीकरण

एकूणच भारतीय स्त्रीला समाजात दुय्यम स्थान देऊन तिचे शोषण करण्यावर भर देण्यात आला. १९ व्या शतकात भारतात सुरू झालेल्या प्रबोधनाच्या चळवळीमुळे स्त्रीप्रश्नांकडे पहिल्यांदा गांभिर्याने पाहिले गेले. समाजसुधारकांनी आपल्या समाजसुधारणेत स्त्रीप्रश्नांना महत्त्वाचे मानले व समाजजागृतीला या अनुशंगाने महत्त्व दिले. या काळात भारतीय स्त्रियांची स्थिती दयनीय होती. 'भारतात वर्गाचे रूपांतर जातीत करण्यासाठी स्त्रियांचा वापर करण्यात आला आहे. भारतातील प्रत्येक वर्गाला बंदिस्त करण्यासाठी म्हणजेच त्याचे जातीत रूपांतर करण्यासाठी विवाहसंस्थेचा उपयोग केला जातो. वर्गांतर्गत विवाहाची सक्ती आणि तिच्या कडक अमंलबजावणीनेच सतीप्रथा, विधवाविवाह बंदी आणि बालजरठ विवाहासारख्या रूढींना जन्माला घामले या अमानुष व्यवहाराला मान्यता देणारी धर्मशास्त्रे बनवली जाऊन ती पवित्र ठरविली गेली त्यात पहिला बळी भारतीय स्त्रीचा गेला'[१] स्त्रियाचे जितके म्हणून शोषण ज्या-ज्या मार्गाने करता येईल तितके करण्याचा प्रयत्न दिसतो. वेगवेगळ्या प्रथा, परंपरांच्या सहाय्याने पशुवत असे जगणे स्त्रीला बहाल केले गेले. या सगळ्या परंपरांनी स्त्रीचे माणूस असणेच नाकारले. ती केवळ पुरुषांवर अवलंबून असणारी, जात, धर्म, संस्कृती याची प्राणपणाने जोपासणा करणारी, उपभोगाची वस्तू अशीच स्त्रीची प्रतिमा रूढ होत गेली. याच्या विरूद्ध जाणारी एखादी स्त्री व्यभिचारी ठरू लागली. असा व्यभिचार घडू नये म्हणून अधिक जाचक निर्बंध लादण्यात आले. यात ती स्वतःचे मुक्त आणि मोकळे जगणे कधी अनुभवू शकली नाही.

काळ बदलला तरी स्त्रियांचे शोषण थांबलेले आहे असे नाही त्याचे संदर्भ बदलले एवढेच. स्त्रीविषयक समाजाची मानसिकता पारंपरिकच दिसते. 'ऐतिकासिक घडामोडींमुळे उदा. साम्राज्यवाद, नवसाम्राज्यवाद आणि जागतिकीकरण या प्रचंड शक्तीखाली नव्याने घडत जाणारी देश-विदेशांची नातेसंबंधांची जागतिक संरचना यामुळे स्त्रियांचे परस्पर संबंध जागतिक पातळीवरच नव्हेत तर देशांतर्गत सुद्धा झपाट्याने बदलत चालले आहेत. तरीही यासर्व बदलांच्या गाभ्याशी

असलेली स्त्री पुरुष संबंधांची गाठ त्या गाठीच्या गाभ्याशी असलेले दुय्यमतेचे व शोषणाचे मुल्य अजूनही जिवंत आहे. किंबहुना या बदलांमुळे या मुल्याला खतपाणी मिळत आहे.'[२] आजच्या बाजारपेठीय संस्कृतीत स्त्रीची वस्तू म्हणून ओळख अधिक तीव्र होते आहे. स्त्रीवादी साहित्यासमोर हे खूप मोठे आव्हान आहे. तसेच जे वेगवेगळे प्रवाह उदा. जहाल, मवाळ, समतावादी इ. स्त्रीवादी विचारांतर्गत दिसतात त्यांच्यात आजच्या काळात एकवाक्यता असणे गरजेचे आहे. कारण या सगळ्या प्रवाहांचे केंद्र स्त्री आहे. त्यामुळे स्त्रीवादी विचारप्रवाह अधिक प्रभावी होऊ शकतो. स्त्रीवादी विचारप्रवाह स्त्रीशोषणाचे संदर्भ अधोरेखित करते. इतिहासातील स्त्रीच्या कर्तृत्वाचा, तिच्या लेखनपरंपरेचा शोधही घेते. स्त्रीला एक माणूस म्हणून जगण्याचे भान देणे हे या विचारप्रणालीचे वैशिष्ट्य आहे. स्त्रीला तिच्या नजरेतून एक व्यक्ती म्हणून पाहण्याचे भान, पुरुषप्रधान व्यवस्थेची दुटप्पी भूमिका समजून घेण्यापासून ते या व्यवस्थेचा पुनर्विचार असा या विचारप्रणालीचा व्यापक प्रवास आहे. यासाऱ्या अनुभवांना साहित्यातून व्यक्त करण्याचा प्रयत्न स्त्रीवादी साहित्य करते. स्त्रीचे अनुभवविश्व अधिक सुक्ष्मपातळीवर व्यक्त होऊ लागले. स्त्रियांनी जे वर्षानुवर्षे अनुभवले, सहन केले त्याच शोषणाच्या संदर्भाना घेऊन स्त्रीवादी साहित्य येते. स्त्रीवादी विचारप्रवाह केवळ शोषणाचे संदर्भ देऊन थांबत नाही तर स्त्रीला स्वतःकडे एक व्यक्ती म्हणून पाहण्याचे नवे भान देतो हे या प्रवाहाचे वेगळेपण म्हणता येईल.

**संदर्भः**


१. भवरे महेंद्र, वर्ग, लिंग, जात आणि समकालीन कविता, नवाक्षर दर्शन, प्रविण बांदेकर (संपा.), जाने-फेब्रु-मार्च, २००७, पृ. ३.

२. दातार छाया, १४ वे विचारवेध संमेलन (अध्यक्षीय भाषण), शिरूर, २००६, पृ. ४०